## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बुधवार दि. १९ ऑक्टोबर २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४३ वी बैठक बुधवार दि.१९ ऑक्टोबर २०११ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. महेंद्र वारभुवन | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ३) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| ५) | मा.श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा.श्री.तारिक फारुकी | सदस्य |
| ८) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| ९) | कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव,म.न.पा. | निमंत्रक |
| १०) | डॉ.श्री.ल.पुलकुंडवार, | अवर सचिव/महाराष्ट्र शासन |
| ११) | डॉ.श्री.रमेश सुरवाडे | सहमुख्य अधिकारी |
| ११) | श्री.प्रल्हाद महिषी,निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस श्री.महिषी,सचिव यांनी मा.श्री.महेंद्र वारभुवन उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचेकडे मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे, प्रथम त्यांची ओळख व स्वागत करण्यांत आले. तद्नंतर त्यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या स्वागत करुन आजची बैठक मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व त्यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १४३.१**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.२९/ ८/२०११ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

-------------

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १८ वर सादर करण्यांत आले आहे.

बैठकीच्या सुरुवातीस सन्मा सदस्य श्री. किसन जाधव यांनी मा श्री.महेंद्र वीरभुवन साहेबांचे स्वागत सर्व मा.सन्मा.सदस्यातर्फे केले.

तद्नंतर त्यांनी मागील बैठकीतील कार्यवृत्तांन्तामध्ये पृष्ठ क्र.२ वर १९१ ताडदेव येथील एक इमारत ऐवजी १९२ - ताडदेव असून तिचे बांधकाम पूर्ण झालेली असून तेथे अशी बाब निदर्शनास आलेली आहे की, त्या इमातीमध्ये मूळ भाडेकरु कमी होते परंतु विकासकांनी चुकीचे कागदपत्र सादर केलेले आहे व बांधकामही परवानगी प्रमाणे झाल्याचे निदर्शनात येत नाही. तरी ही बाब तपासावी व त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यांत यावी असे सुचविले. त्याप्रमाणे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी चौकशी केलेली आहे, त्याबाबत खुलासा करण्यांत यावा. .

मा.मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ यांनी संबंधित कार्यकारी अभियंता याबाबत विचारणा केली त्यांनी सांगितले की, सदर इमारतीची प्रत्यक्ष पहाणी केली असता, तेथे मूळ भाडेकरु एकूण १० होते, परंतु सध्या सदर इमारतीत रहात असलेल्या व्यक्ति हे मूळ रहिवाशी नसून अन्य व्यक्ति आढळून आलेले आहेत सदर व्यक्तिंचे कागदपत्र तपासले असता त्यांनी सदर गाळे विकत घेतल्याचे निदर्शनास आलेले आहे, तसेच याबाबत विकासकास पत्र देण्यांत आलेले असून त्यांनी ओ.सी.साठी पत्र दिल्याचे समजले, तसेच याबाबत कार्यवाही करण्यांबाबत महानगर पालिकेस कळविण्यांत आलेले आहे. विकासकासही कार्यालयातर्फे पत्र पाठवून त्याचेकडून अतिरिक्त क्षेत्रफळ मंडळास देण्यांत आलेले नाही, याचीही पडताळणीकरुन पत्र दिलेले आहे. तसेच महानगर पालिकेशी संबंधित विषयाबाबत पत्रव्यवहार करण्यांत आल्याचे सांगितले याप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

यावर सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे स्पष्ट केले की, सदर इमारतीत रहात असलेले मूळ रहिवाशी हे बहुतांशी पारसी व ख्रिश्चन होते त्यांना बाजूला करुन सध्या रहात असलेले रहिवाशी हे अन्य आहेत. तसेच अश्या प्रकारे ब-याच इमारतीमध्ये अनधिकृतपणे पाणी व लाईट दंड भरुन घेतात व त्यांची कामे सुरळीत चालू आहे. ब-याच कालावधी गेल्यानंतर अन्य मार्गाने ओ.सी. घेण्यांत येते. आपले महत्वाचे उद्दिष्ट हे राहिले पाहिजे की. आपल्या मूळ रहिवाशाला घर मिळणे परंतु असे निदर्शनास येते की, हा मुद्या बाजूला राहून विकासकाचे भले करण्याचा विचार जास्त होत असल्याचे चित्र दिसत आहे. असे प्रकार ब-याच ठिकाणी घडत आहे, याकडे मंडळाच्या अधिका-यांचे दुर्लक्ष झालेले आहे, तरी याबाबत सखोल चौकशी करुन सक्त कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी /मुं.इ.दु.व पु.मं. यांनी श्री.सेठ,उपमुख्य अभियंता यांना सूचना केली की, याबाबत सखोल चौकशी करुन अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यांत यावा.

यानंतर सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर.सुधारणेबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची चौकशी केली व हा मुद्दा मागील दोन तीन बैठकीमध्ये चर्चीला गेलेला असून यावर अंतिम कार्यवाही अपेक्षित आहे.

श्री.महिषी, सचिव यानी सदर प्रकरणी मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांचेस्तरावर डी.एस.आर.सुधारित करणेबाबत बैठक घेण्यात आली असून, प्रत्येक बाबींचे दर विश्लेषण करण्याकरिता उपमुख्य अभियंता- परिमंडळ- ३ व ४ / मुं.इ.दु.व पु.मंडळ यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला असून उपमुख्य अभियंता- परिमंडळ- १ व २ / मुं.इ.दु.व पु.मंडळ यांचेकडून अहवाल लवकरच प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.त्यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर सर्व एकत्रित करुन, डी.एस.आर. सुधारणा करण्याकरिता मा.मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

यानंतर सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर.सुधारणेबाबत अंतिम कार्यवाही आमचे कालावधीत पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती परंतु तशी कार्यवाही होईल असे वाटत नाही, असे मत प्रदर्शित केले.

यावर सचिव / दु.व पु. यांनी आश्वासन दिले की, डी.एस.आर.सुधारणेबाबत ५० टक्के काम झालेले आहे, अंतिम निर्णय लवकरच होईल.

मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं. यांनी यावर असे सांगितले की, ही सर्व कार्यवाही १ ते दीड महिन्यात पूर्ण करावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना फारच चांगल्याप्रकारे बनविल्याचे सांगितले पुढे त्यांनी असे सुचविले की, अशाच प्रकारे आपल्या वितरण पत्रातही ब-याच त्रुटी आहेत. त्यामध्येही बदल होणे गरजेचे आहे. त्यामुळे व्हॅकेशन नोटीसप्रमाणे वितरण पत्राचाही नमुन्यामध्ये फेरबदल करुन नवीन नमुना तयार करण्यात यावा असे मागील बैठकीत सांगितले होते त्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे आम्हाला अवगत आहेच तरी याबाबत माहिती देणेबाबत विनंती केली.

मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना व प्रस्तावास मंडळाची मान्यता प्राप्त झालेली असून सदर विषयाची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीस्तव सादर करण्यांत आलेली आहे. प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर नवीन व्हॅकेशन नोटीसचा नमुना वापरण्यात येईल, असे सांगितले.

यावर सहमुख्य अधिकारी यांनी सर्व उपस्थितांना अशी माहिती दिली की, याबाबत बरीच चर्चा करुन एक सॉफटवेअर तयार करण्यांचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये सर्व वितरणाच्या प्रक्रिया एकत्रित असतील उदा. व्हेकेशन नोटीस वितरण पत्र,ताबा पत्र इतर सर्व वितरणाबाबतची कार्यवाही एकत्रित करण्यांत आलेली असल्यामुळे , याबाबतचे एक प्रेझेंटेशन तयार करण्यांत आलेले असून, ते या बैठकीच्या शेवटी सर्वांना दाखविण्यांत

येईल ते पाहिल्या नंतर आपण सर्वांनी त्यामध्ये काही सुधारणा/सूचना असल्यास जरुर सुचवाव्यात म्हणजे त्या त्यामध्ये समाविष्ट करण्यांत येतील, अशी सर्व सन्मा.सदस्यांना व अधिका-यांना विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बॅकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद चांगला मिळत असून त्यासाठी आपण भाडेकरु/रहिवाशांनी, जर तीन महिन्याचे भाडे एकदम भरल्यास त्यांना जी ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झालेली आहे का ? असे विचारले.

यावर सहमुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की,सदर विषय प्राधिकरणाच्या बैठकीत घेतल्यानंतर त्यावर चर्चा होवून , चर्चेअंती असा निर्णय झाला की, सारस्वत बॅंकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळे व भाडेकरु / रहिवाशी जर एक वर्षाचे भाडे एकदम भरत असतील तर त्यांना ही सवलत ३ टक्के एवढीच न देता बॅकांचा व्याज दर एवढे देणेबाबत विचार करण्यांत आलेला आहे.

याबाबत किती सवलत द्यावी हा निर्णय घेण्याचा अधिकार मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत आलेला आहे. याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीमध्ये एक अभ्यास गट संघटित करण्यांत आलेला होता त्यामध्ये मंडळाचे सन्मा.सदस्य तसेच श्री.अर्गेकर, तत्कालिन उपमुख्य अभियंता हे निमंत्रक होते, या अभ्यास गटाने एक अहवाल तयार केला होता. सदर अहवालाबाबतची कार्यवाही कितपर्यंत झालेली आहे. अहवाल आजपर्यंत मंडळाच्या बैठकीत का ठेवण्यांत आलेला नाही.

यावर श्री. महिषी, सचिव यांनी स्पष्टीकरण केले की, अभ्यास गटाने सादर केलेला अहवालातील मुद्यांबाबत काही सुचना अभिप्राय मंडळाच्या सर्व उपमुख्य अभियंता, परिमंडळ- १,२,३ व ४ यांचेकडून कार्यकारी अभियंता यांना दिलेला असून काही अधिका-यांकडून तो प्राप्त झालेला आहे, उर्वरित अधिका-यांकडून प्राप्त झाल्यानंतर सर्व अहवाल एकत्रित करुन प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करुन नंतर प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत प्रयत्न सुरु आहेत.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, जर मंडळाच्या काही अधिका-यांनी अहवाल दिलेला आहे त्यांचे मी अभिनंदन करतो व ज्या अधिका-यांकडे अजून प्रलंबित आहे तो का प्रलंबित आहे, ते त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याबद्दल खेद व्यक्त केला तसेच पुढे त्यांनी असेही सागितले की, जर काही अधिकारी अहवाल पूर्ण करुन देवू शकतात तर काही अधिकारी का देवू शकत नाही, या दिरगांईबाबत त्यांचेवर कार्यवाही होणे गरजेचे आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, काही अधिकारांनी अहवाल न दिला यांचे कारण ते दिरंगाई करीत आहे असा नसून ते अहवाल तयार करीत आहेत. तद्नंतर सदर प्रस्ताव लवकरच मंडळाच्या बैठकीत ठेवण्यांत येईल नंतर शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यांत येईल. ही बाब महत्वाची असल्यामुळे ज्यांनी अहवाल दिला नाही त्यांनी तो लवकर द्यावा म्हणजे मंडळाच्या येणा-या बैठकीपर्यंत मंडळासमोर सादर करता येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले त्यांच्या विभागातील भटचाळ, ताडदेव या विभागातील इमारतीस सन २००३ साली एनओसी देण्यांत आलेली असून त्या इमारतीची अत्यंत वाईटस्थिती असून विकासक त्याबाबत काही करीत नाही. तसेच त्यांनी असेही मंडळासमोर आणून दिले की, जर एनओसी देवून आठ वर्षाच्या कालावली जात असेल, तर मंडळातर्फे पुनर्विकासाचे काम कशा प्रकारे होणार याबाबत खंत व्यक्त केली, पुढे त्यांनी श्री.सेठ,उपमुख्य अभियंता हे याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करणार होते, तरी त्यांनी याबाबत माहिती देणेबाबत विनंती केली.

श्री.शेठ, उपमुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले की,याबाबत विकासक व रहिवाशी यांची एकत्रित सुनावणी घेण्यांत आलेली असून, पुढील आठवडयात दि.२१/१०/२०११ रोजी मा.मुख्य अधिकारी यांचेकडेही भाडेकरु व विकासक यांचेसह सुनावणी घेण्यांत येणार आहे. याबाबत नकाशे दुरुस्ती करुन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहे.तसेच यामध्ये रहिवाशांनी काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आणल्यामुळे , भाडेकरु व विकासक यांचेमध्ये वाद सुरु आहे. त्यामधून लवकरच काही मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसेच विकासक यांनी आवश्यक ती मदत व दुरुस्त्या करुन देण्याचे आश्वासन दिले आहे.त्याबाबत मंडळाच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले सातआसरा ही इमारत पीएमजीपी प्रकल्पातर्फे बांधण्यात आलेली असून त्यामध्ये एका खोलीत स्लॅब कोसळून एका बाईच्या डोक्याला जखम झाल्याची बातमी दै. महाराष्ट्र टाईम्स वर्तमान पत्रात प्रसिध्द झाली होती, याबाबत त्यांनी पत्र ही दिले होते तरी याबाबत मंडळातर्फे कोणती कार्यवाही झालेली आहे त्याची माहिती दयावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे सांगितले की, संकल्पसिध्दी ही इमारत मंडळाने १९८० पूर्वी बांधलेली असून, त्याइमारतीची दुरुस्तीही मंडळातर्फे करण्यांत आलेली आहे. या इमारतीची पहाणी त्यांनी व श्री.पाटील, कार्यकारी अभियंता यांनी एकत्रित केलेली आहे. त्यामुळे सध्या तेथील रहिवाशांचे असे मत आहे की, जसे आपण

पीएमजीपीतंर्गत बांधलेल्या इमारतीबाबत निर्णय घेतलेला आहे त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे, त्याचप्रमाणे या इमारतीत रहात असलेल्या भाडेकरु / रहिवाशानी तशा प्रकारचे पत्रही मंडळास दिलेले आहे. सदर इमारत आता दुरुस्तीच्या पलिकडे गेलेली असून, त्याची पुर्नबांधणी मंडळातर्फे करण्यांबाबत पत्र दिलेले आहे. याबाबत विचार होणे आवश्यक वाटते.

निवासी कार्यकारी अभियंता यांनी यावर असे स्पष्ट केले की, ३३(७)खाली ज्याइमारती आपण जाईन्ट व्हेंचरखाली पुनर्विकसित करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे निर्णय प्रलंबित असल्यामुळे त्यावर लवकर निर्णय अपेक्षित आहे, अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर अशा इमारतीचा पुनर्विकास करणेबाबतची कार्यवाही सुरु होईल. यामध्ये उमरखाडीचा ९ इमारतीचा प्रस्तावही समाविष्ट आहे.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी स्पष्ट केले की, वरील प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यास अशा प्रकारच्या ब-याच इमारती आहे, पीएमजीपीतंर्गत बांधलेल्या ६६ इमारती असून तसेच गिरगाव मध्ये चार इमारती आहे तसेच संकल्पसिध्दी इमारतीमध्ये तर १६५ चौ.फूटाच्या सदनिका आहे तर अशा इमारतीबाबतही विचार व्हावा.

यावर डॉ.श्री.ल.पुलकुंडवार, अवर सचिव/ महाराष्ट्र शासन यांनी असे स्पष्ट केले की, उमरखाडीच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे व यापुढे शासनाकडे सादर होणारा प्रस्तावाना लवकरात-लवकर मंजूरी प्राप्त होणेकरिता शासनातर्फे जी काही मदत करणे शक्य आहे ती आम्ही करण्याची सर्वोतो पर्यंत करु, असे बैठकीत त्यांनी सर्वांना आश्वासन दिले.

यानंतर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी श्री.शंकर पांर्टे सारख्या ब-याच व्यक्ती आज कित्येक वर्षे संक्रमण शिबिरात रहात असून , त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे मागील बैठकीत सांगितले होते, कारण अशाच प्रकारे ब-याच इमारती अनधिकृतपणे उभ्या आहेत व त्यामध्ये अनधिकृत लोक रहात आहे. मात्र मूळ भाडेकरु/रहिवाशी हे वर्षांवर्षे संक्रमण शिबिरात रहात असून, त्यांचा काही दोष नसतांना त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही होणे गरजेचे आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबतची कार्यवाही करण्यांत येणार होती, ती करण्यांत आलेली आहे का.

तद्नंतर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी स्पष्ट केले की, मंडळातर्फे मास्टर लिस्टबाबत जो सर्व्हे केला, त्याव्दारे सुमारे ८००० अर्ज प्राप्त झालेले आहे, त्यानुसार कार्यवाही सुरु असून, त्यामध्ये सदर इमारत अनधिकृतपणे बांधलेली आहे की, पुनर्रचित झालेली आहे, हे तपासणे शक्य झाले त्यानुसार आतापर्यंत तीन इमारती अनधिकृतरित्या बांधलेल्या असल्याचे निदर्शनात आले असून त्याबाबत कार्यवाही सुरु असून अशा

इमारतीतील मूळ रहिवाशी/भाडेकरुंना मास्टर लिस्टमध्ये सामावून घेणेबाबत बाब टिप्पणी तयार करण्यांचे प्रस्तावित होते, तसेच ही बाब धोरणात्मक असल्याने शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे,असे मागील बैठकीत सांगण्यात आले परंतु सदर रहिवाशाची सुनावणी झालेली नसल्यामुळे त्यांना मास्टर लिस्टमध्ये सामावून घेणेबाबतची कार्यवाही कशा प्रकारे होणार आहे.

याबाबत श्री.सुरवाडे, सहमुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ  यांनी खुलासा केला की, जर अशा अनधिकृत इमारती उभ्या आहेत तर त्यामधील भाडेकरुचे पुनर्वसन करणे ही जरी मंडळाची जबाबदारी असली तरी सदर इमारती अनधिकृतपणे उभ्या राहिल्या आहेत, त्यावर महानगर पालिकेने कार्यवाही करणे गरजेचे आहे, कारण या इमारतीस ओसी,पाणी पुरवठा लाईट इत्यादीची परवानगी मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यांत येत. मंडळातर्फे सदर अनधिकृत इमारतीबाबत महानगर पालिकेस पत्र देवून त्यांना सदर इमारतीत रहात असलेल्या मूळ भाडेकरुचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यांत यावी, तसेच त्यांना याचीही कल्पना देण्यांत यावी की, सदरचे भाडेकरु/रहिवाशी हे मागील २० ते ३० वर्षे मंडळाच्या संक्रमण शिबिरात वास्तव्य करीत आहे.

तद्नंतर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे स्पष्ट केले की, सदर इमारतीमध्ये रहात असलेल्या मूळ भाडेकरुंना मंडळातर्फे घर देणे ही मंडळाची जबाबदारी असल्यामुळे आपण म्हणत असल्याप्रमाणे महानगर पालिकेस आपण पत्र द्याल तद्नंतर त्यावर कार्यवाही होईल यासाठी किती कालावधी लागेल याची शाश्वती नाही. तसेच सदरची कार्यवाही करण्यांस मंडळाच्या अधिका-यांना २५ वर्षे लागतात. त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की, मंडळातर्फे मास्टर लिस्टबाबत जो सर्व्हे केला आहे, त्यामध्ये तीन इमारती अनधिकृत आढळलेल्या असून त्यामधील रहिवाशांना प्रथम घर देणेबाबत प्राधान्याने विचार व्हावा, ही विनंती मी मंडळास करीत करीत आहे.

याबाबत श्री.सुरवाडे, सहमुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ  यांनी खुलासा केला की,सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुद्याशी मी पूर्णपणे सहमत असून अशा लोकांना आपण बृहसूचीमध्ये घेवून त्यांना गाळा देणे ही आपली जबाबदारी आहे. याबाबत मी आपणांस एक प्रेझेंटेशन दाखविण्यांत येणार आहे ते पाहिल्यानंतर आपल्या ब-याच प्रश्नाच्या उत्तरांचे निरासण होईल. तसेच हेही निदर्शनास आलेले आहे की, मंडळाकडे २९२ प्लॉट असे आहेत की, तेथे काहीना काही कारणामुळे आपण इमारती बांधू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या ब-याच बाबी आपल्यापुढे येण्याची शक्यता आहे.

तद्नंतर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे स्पष्ट केले की, सदर इमारतीमध्ये रहात असलेल्या मूळ भाडेकरुंना मंडळातर्फे घर देणे ही मंडळाची जबाबदारी असल्यामुळे व मागील एक दोन बैठकीत मा.मुख्य अधिकारी यांनी सदरबाबतचा प्रस्ताव शासनाकडे

पाठविणेबाबत संबंधिताना सूचना दिलेला होत्या, त्यामुळे बाकीच्या प्रकरणाबाबत जी पॅलिसी होईल धोरणात्मक निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही होवू दयावी, त्याबाबत आमच्या सर्व सदस्याचा विरोध नाही फक्त या तीन अनधिकृत इमारतीमधील रहिवाशांना मास्टर लिस्टमध्ये घेणेबाबत प्रस्ताव लवकरात-लवकर शासनास सादर करण्यांत यावा.

यावर श्री.सुरवाडे, सहमुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी त्यांना सांगितले की, आपल्या म्हणण्याप्रमाणे आतापर्यंत तीन इमारती अनधिकृतरित्या बांधलेल्या असल्याचे निदर्शनात आले असून त्यामधील मूळ रहिवाशांना घर देणे ही मंडळाची जबाबदारी असल्यामुळे, अशा इमारतीतील मूळ रहिवाशी/भाडेकरुंना मास्टर लिस्टमध्ये सामावून घेणेबाबत बाब टिप्पणी तयार करण्यात येईल. तसेच ही बाब धोरणात्मक असल्याने शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे, परंतु ही बाब टिप्पणी फक्त या तीन इमारतींबाबत मर्यादित राहिल. तसेच ही एक वेगळी जबाबदारी मंडळावर आलेली आहे.

तद्‌नंतर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीत मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना सूचना केल्या की, वर नमूद केलेले मुद्दे विचारात घेवून अश्या प्रकारच्या इमारतीबाबत तसेच ज्याचे क्षेत्रफळ ४०००मिटरपेक्षा जास्त असेल तर अशा इमारतींचा पुनर्विकास मंडळातर्फे करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करणे, तद्‌नंतर त्यास शासनाची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत विचार करण्यांत येवू शकेल. वर नमूद केल्याप्रमाणे अश्या इमारती विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) खाली घेणेबाबतचे प्रस्ताव तयार करण्यांत यावे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी म्हाडाने जमिन संपादन केलेल्या जागेवर एकत्रितपणे विकास करण्याचा प्रस्ताव होता, परंतु याबाबतची कार्यवाही होत नाही व बरेच वर्षे जमिन पडून राहते त्यानंतर सदर जमिनीवर अनधिकृत व्यक्ति आपले वास्तव्य करतात किंवा अनधिकृतपणे बांधकाम होवून इमारत ऊभी रहाण्याची शक्यता असते. तर असा प्रस्ताव आहे की, सदर जमिनीवर म्हाडाने विकास करावा असा प्रस्ताव मंडळातर्फे शासनास सादर करणेबाबत विनंती केली.

श्री.सेठ,उपमुख्य अभियंता यांनी आपल्या विभागातील संकल्पसिध्दी, पिंपळश्वर कृपा व त्याचा आजूबाजूच्या पीएमजीपीतंर्गत बांधलेल्या इमारतीचा समुह आहे, त्याबाबतची आता सर्व प्रासेस पूर्ण होऊन अंतिम टप्पात आहे. प्रस्ताव लवकरच सादर करण्यांत येईल असे सांगितले.

यावर मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं.यांनी सर्व कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांना सूचना केली की वरील विषयाबाबत आपआपल्या विभागातील पुनर्विकासाठीचे प्रस्ताव सादर करावा.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी चिंचपोकळी येथे अलिकडे मोतीवाणी म्हणून एक इमारत असून तेथे मा.श्री.छगनभुजवळ साहेब यांचे शुभहस्ते भूमीपूजन झालेले असून सदर इमारतीचे पुनर्बांधणीचे काम प्रलंबित आहे व ही संपादन केलेली इमारत असून काम सुरु होण्यास वेळ लागतो. त्यामुळे अनधिकृत इमारती उभ्या रहातात, त्यामुळे याबाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे, व याबाबत नाराजी व्यक्त केली.

यावर श्री. काळे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, रहिवाशांनी चालू असलेले काम बंद पाडले कारण नवीन धोरणानुसार त्यांना आता २२५ ऐवजी ३०० चा एरिया हवा आहे, त्यामुळे तशा प्रकारची नकाशात सुधारणा करुन प्रस्ताव महानगर पालिकेकडे मंजूरीस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे, तसेच विकासकामार्फत पुनर्विकासाकरिता रहिवाशांमध्ये कार्यवाही सुरु असल्यामुळे सदर कामास वेग देता येत नाही व काम प्रलंबित आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर इमारतीच्या पुर्नबांधणीचा प्रस्ताव अंतिम टप्पावर असून लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येवून कार्यवाही सुरु होण्याची शक्यता आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, वाळकेश्वर येथील ७४-७६ सुभद्रा नावांची ही इमारत असून त्याइमारतीवर पाठीमागून डोंगर कोसळून काही भाग कोसळून यामध्ये वर्षा महाडीक ही मुलगी जखमी झालेली असून,सदर इमारतीचे दुरुस्तीचे काम मंडळातर्फे सुरु करण्यांत येणार होते परंतु पुढे काय झाले. सदरचे काम हे महानगर पालिकेचे असून ते करणेबाबत आम्ही प्रयत्न करणार आहेत. सदर इमारतीत मी व मंडळाचे अधिकारी श्री.सेठ उपमुख्य अभियंता यांनी काल प्रत्यक्ष भेट दिली असून, सदर इमारतीचे दुरुस्तीचे काम मंडळातर्फे करण्यांत येणार असल्यामुळे सदर इमारतीत टेकू लावण्याचे कामास लवकर सुरुवात करण्यांत येईल असे मागे ठरले होते व दूरध्वनीवर चर्चा झाल्याप्रमाणे आजही कार्यवाही सुरु झालेली नाही, ही खेदाची बाब असून सदर इमारतीस मा.मुख्यमंत्री यांनीही भेट दिलेली आहे. तसेच त्यानी पुढेही असेही स्पष्ट केले की, संबंधित विभागातील कार्यकारी अभियंता हे याबाबकडे जातीने लक्ष देत नाही,असा माझा स्पष्ट आरोप आहे. तरी याबाबत खुलासा व्हावा.

यानंतर मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मं. यांनी संबंधित कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांना याबाबत खुलासा देण्याची सूचना केली.

श्री.गडकरी, कार्यकारी अभियंता यांनी याबाबत खुलासा केला की, कार्यादेशावर आजच सही झालेली आहे व लवकर इमारतीमध्ये दुरुस्तीचे काम सुरु करण्यांत येईल.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी वरील कार्यवाहीबाबत नाराजी व्यक्त केली त्यांनी असेही पुढे सांगितले की, मा.मंत्रीमहोदय श्री.मुरली देवरा यांनी उपोषणही केलेले आहे परंतु मंडळाच्या अधिका-यांचे दुर्लक्ष होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

यावर श्री.महिषी, सचिव यांनी याबाबत खुलासा केला की, सदर प्रकरणी कोर्टकेस असल्यामुळे कार्यादेश देण्यास विलंब झालेला आहे, लवकरच तेथील काम सुरु होईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पुढे असेही सांगितले की,एमपी मिल कंपाऊडबाबत मी आपल्या पत्र देवून चार महिन्याचा कालावधी लोटला आहे. संक्रमण शिबिरात भाडेकरुंची घुसखोरी झालेली आहे. त्याबद्दल काय कार्यवाही झालेली आहे, हे मला समजले आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सायन प्रतिक्षा नगर, संक्रमण शिबिरात रहात असलेल्या भाडेकरु/ रहिवाशांचा समस्याबाबत मागील बैठकीत मुद्या उपस्थित केला होता, तद्नंतर श्री.शेट्टी,कार्यकारी अभियंता यांचेसह तीन ते चार वेळा व्हिजिट केलेली असून आता स्थानिक नगरसेवक यांना भेटून सदर ठिकाणी जी आवश्यक काम आहे ती लवकरच करण्यांत येतील अशी आशा आहे. जेणेकरुन संक्रमण शिबिरात राहणा-या भाडेकरु/रहिवाशांना प्राथमिक सोईसुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे सांगितले की,आजच्या दि.१९/१०/२०११ च्या दै.लोकसत्ता या वर्तमान पत्रात " **दक्षिण मुंबईतील १२ बिल्डरांनी लाटल्या सामान्यांसाठी असलेल्या ५०० सदनिका** " **ही** बातमी प्रसिध्द झालेली आहे, अशा प्रकारच्या बातमीमुळे मंडळाची प्रतिमा खराब होते, सर्वसामान्यांच्या मनात म्हाडाविषयी रोष निर्माण होतो. सर्वसामान्य लोकांना हे समजत नाही की या सदनिका कोणी लाटल्या, हे बातमी आपल्या मागील ३३ प्रकरणांस धरुन आलेली आहे. ३३ प्रकरणांपैकी २९ प्रकरणांत विकासकांवर गुन्हे दाखल करण्यांत आले असून ४ प्रकरणाबाबत गुन्हे दाखल करणे प्रलंबित होते. तसेच या इमारती पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) लागू होते. यातील तरतुदीनुसार पुनर्वसनासाठी म्हाडाकडून " ना हरकत प्रमाणपत्र " दिले जाते. मूळ रहिवाशांसाठी पुनर्रचित इमारत बांधून देणे हे तर बंधनकारक आहे तसेच अतिरिक्त एफएसआयतंर्गत प्राप्त होणा-या सदनिका म्हाडाला हस्तांतरीत करण्याऐवजी परस्पर विकले. याबाबत मंडळाच्या अधिका-यांकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

यावर श्री.महिषी सचिव यांनी स्पष्ट केले की, वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु केलेली असल्यामुळे वर्तमानपत्रात बातमी येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्मानिय सदस्यांचा असे निदर्शनास आणून दिले की, काही मुद्दे मागील बैठकीच्या कार्यवृत्तांत आलेला नाही.

यावर श्री.महिषी,सचिव यांनी खुलासा केला की, नमुद केलेली रक्कम ही २२८ करोड नसुन १०८ कोटी इतकी आहे व सदर बाबतीत माहिती सर्व स्तरांवर देण्यांत आलेली असल्यामुळे , त्यामुळे अशी रक्कम नमुद करण्यांत आलेली नाही.

मा.अध्यक्ष महोदयांनी आपण मंडळास देय अतिरिक्त क्षेत्रफळ घेतल्याशिवाय रहिवास प्रमाणपत्र देत नाही, असे सांगितले व सचिव यांना सदर मुद्दा मागील बैठकीच्या कार्यवृत्तांत न आल्याबद्दल नोंद घेणेबाबत सूचना केली.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी संबंधित विकासकास ब्लॅक लिस्ट करण्याबाबत सांगितले. तसेच त्यांनी याबाबत मा.मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ यांनाही पत्र दिल्याचे निदर्शनास आणले.

त्यावर निवासी कार्यकारी अभियंता यांनी संबंधित विकासक जे भाडेकरु/रहिवाशांच्या संम्मतीने नियुक्त केलेले असतात, त्यांचे मंडळामध्ये रजिस्ट्रेशन नसते, त्यामुळे त्यांचेसंबंधित अशा प्रकारची कार्यवाही करणे शक्य झाली नाही.

सदर प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी वेगळया नस्तीवर विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे अभिप्राय घेवून मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यकरिता प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे, त्याचा पाठपुरावा सुरु आहे.

सहमुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी (पुगा) यांचे कार्यालयातील सर्व नस्त्यांचे नंबरीग व फाईलची नोंद सुरु असून सदरचे काम अंतिम टप्पावर असल्याचे सांगितले तसेच सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी उपस्थित केलेल्या वरील मुद्दाबाबत कार्यवाही सुरु असून त्याबाबतचा खुलासा/पत्र त्यांना लवकर देण्यांत येईल.

तसेच मा.मुख्य अधिकारी यांनी सन्मा.सदस्य श्री.नायर यांनी इतर जे काही विकासक व पुनर्विकासंबंधित जे मुद्दे उपस्थित केले ते मुद्दे बैठकीत चर्चेले जाण्यासारखे नसून आपण वैयक्तिक निवासी कार्यकारी अभियंता व उपमुख्य अधिकारी यांचे कार्यालयात जावून आपल्या शंकाचे निराकरण करुन घ्यावे, तसेच आवश्यकता असल्यास मला भेटून, त्याबबात चर्चा करण्याचे आश्वासन दिले. तसेच सदरची माहिती उपमुख्य अधिकारी/पुगा , निवासी कार्यकारी अभियंता/ दु.व पु.मंडळ व सहमुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांचे अखत्यारित असल्यामुळे त्यांनी सदर माहिती त्यांना दिली आहे. तथापि अतिरिक्त माहिती हवी असल्यास वैयक्तिकरित्या संपर्क साधून माहिती घ्यावी असे सूचित केले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी संजना या इमारतीचा जमिन भूसंपादनचा एक प्रस्ताव होता, त्याबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे. सदर इमारत पूर्ण खाली केलेली असून तेथे ७० टक्के भाडेकरुंचे प्रोत्साहन मिळालेले असून, सदर इमारतीत कोणते लोक राहतात याबाबत काहीच समजत नाही. सदर इमारतीस मा.सचिन अहिर यांचेसह आम्ही भेट दिली होती. सदर इमारतीस नेमलेला विकासक आपल्या लहरीपणाप्रमाणे काम करणार

आहे का, सदर इमारतीच्या पुनर्विकासाचे काम मार्गी का लागत नाही.याबाबत विचारणा केली.

श्री.गडकरी, कार्यकारी अभियंता यांनी याबाबत स्पष्ट केले की, पुनर्विकासाकरिता ७० टक्के भाडेकरुंचे प्रोत्साहन नुकतेच मिळालेले आहे. आता काही कागदोपत्री प्रोसेस पूर्ण होणे शिल्लक आहे. लकरच याबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष व अवरसचिव यांचे निदर्शनास आणून दिले की. संजना या इमारतीबाबत मंडळाच्या अधिका-यांकडून फार दिरगांई होत असून भविष्यांत सदर इमारत कोसळून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर विभागातील कार्यकारी अभियंता यांनी इमारत खाली करुन रहिवाशांना संक्रमण शिबिरात हलविणेबाबतची कार्यवाही जलद गतीने करणे सर्वात महत्वाचे आहे. तरी याबाबत आपण जातीने लक्ष घालावे अशी विनंती आहे.

मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मं. यांनी संबंधित कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांना पुढील बैठकीपर्यंत, संजना इमारतीबाबत अंतिम टप्पात कार्यवाही व्हावी, अशा सूचना केल्या.

**वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.**

**बाब क्रमांक - १४३- (२)**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत**
**१. परिमंडळ- १ मधील (अ,सी-१,सी-२ व सी-३) ७६ इमारती.**

-----o---o----

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१९ ते ४१** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४३/ १२६७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार ७६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. १०,९४,२९,१६४/-(रुपये- दहा कोटी चौ-याण्णप लक्ष एकोणतीस हजार एकशे चौसष्ट फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६,२८,३५,२८६/- (रुपये सहा कोटी अठ्ठाविस लक्ष पस्तीस हजार दोनशे श्यार्एेंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

बाब क्रमांक - १४३ -२ (२)

विषय - २. **परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, व ग-दक्षिण) **११ इमारती.**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **४३ ते ५१** वर सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १४३/१२६८

**मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस** आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,०४,३४,००६ /-(रुपये- दोन कोटी चार लक्ष चौतीस हजार सहा फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,२३,३२,४८७ /- (रुपये दोन कोटी तेविस लक्ष बत्तीस हजार चारशे सत्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o----------

बाब क्रमांक - १४३. २ (३)

विषय - **परिमंडळ-३** मधील (ब, ई-१ व ई-२) **१३ इमारती.**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५३ ते ६१ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १४३ /१२६९

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,३६,२४,३१८ /-(रुपये- दोन कोटी छत्तीस लक्ष चोविस हजार तिनशे अठरा फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,३४,९४,०२५.५५ /- (रुपये एक कोटी चौत्तीस लक्ष चौ-याण्णव हजार पंचविस आणि पंचावन्न पैसे फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o----------

<u>बाब क्रमांक - १४३. २ (४)</u>

**विषय - परिमंडळ-४** मधील (ग-उत्तर फ-उत्तर व फ-दक्षिण) **०९ इमारती.**

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६३ ते ७१ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक १४३/१२७०</u>

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,०२,००,१४४ /-(रुपये-तीन कोटी दोन लक्ष एकशे चौवेचाळीस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,६१,८४,६५२ /- (रुपये एक कोटी एकसष्ट लक्ष चौ-याऐंशी हजार सहाशे बावन्न फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------0-----0-----------

<u>बाब क्रमांक - १४३. ३</u>

विषय - इमारत क्र.४४-५०, पाकमोडीया स्ट्रीट या इमारतीच्या अंदाजपत्रकास १४०व्या बैठकीत दिलेल्या प्रशासकीय मान्यतेतील बदलाबाबत.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७३ ते ७७ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

-----------0-0------0---------

<u>ठराव क्रमांक - १४३ /१२७१</u>

सविस्तर चर्चेअंती इमारत क्र.४४-५०, पाकमोडीया स्ट्रीट या इमारतीच्या दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत बाब टिप्पणी मंडळाच्या दि.५/७/२०११ रोजी झालेल्या १४० व्या बैठकीत सादर करण्यांत आली होती. प्रशासकीय मान्यतेची रक्कम टंकलेखन चुकीने रु.२,१६,३९७/- दर्शविण्यांत आली होती. परंतु सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.२१,६३,२९७/- अशी पाहिजे होती.याकरिता प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.२,१६,३९७/- ऐवजी रु.२१,६३,२९७/- अशी वाचण्यास व अशी सुधारणा करण्यास व विषयांकित इमारतीच्या दुरुस्ती अंदाजपत्रकास रु.२१,६३,२९६/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------0-----0-----------

बाब क्रमांक १४३.४

**विषय** - परिमंडळ-१ मधील इ.क्र.५३-५७बी, भंडारी स्ट्रीट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाकरिता प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२,०००/- चौ.मी. लागू करणेबाबत.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७९ ते ८१ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १४३ /१२७२

सविस्तर चर्चेअंती परिमंडळ-१ मधील इ.क्र.५३-५७बी, भंडारी स्ट्रीट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाकरिता प्रचलीत प्रमाणीत मर्यादा रु.२०००/- चौ.मि. लागु करण्यास सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

-------------o-------o-----------

बाब क्रमांक - १४३. ५

**विषय** - इमारत क्रमांक १८-१८, "अ", अरब लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
-----प्रशासकीय मंजूरीपेक्षा जास्त येणाऱ्या व प्रचलित दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेअंतर्गत येणाऱ्या अतिरिक्त रकमेस मंजूरी मिळणेबाबत.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.८३ते ८७ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक -१४३/ १२७३

सविस्तर चर्चेअंती इमारत क्रमांक १८-१८, "अ", अरब लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीकरिता व प्रशासकीय मंजूरीपेक्षा जास्त येणा-या व रु.२०००/- चौ.मि. प्रचलित दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेअंतर्गत येणा-या अतिरिक्त खर्चाच्या रक्कमेस रु.१५१०२०/- या रक्कमेस मंजूरी व रु. २४,३१०२०/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता सवानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

-------------o-------o-----------

बाब क्रमांक १४३.६

**विषय** - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, डी-३ व ग-दक्षिण विभागातील १४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना दिलेली १३८ व्या बैठकीमध्ये देण्यात आलेली प्रशासकीय मंजूरी ग्राह्य धरुन १३९व्या बैठकीत देण्यात आलेली प्रशासकीय मंजूरी वगळण्यात यावी व सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आणून देण्याकरिता.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.८९ ते १०१ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक -१४३/ १२७४

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, डी-३ व ग-दक्षिण विभागातील १४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना दिलेली १३८ व्या बैठकीमध्ये देण्यात आलेली प्रशासकीय मंजूरी ग्राह्य धरुन १३९व्या बैठकीत देण्यात आलेली प्रशासकीय मंजूरी वगळण्यास सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

बाब क्रमांक - १४३. ७

विषय - इ.क्र.१६३-डी, हरिहर निवास, डॉ.बी.ए.मार्ग, दादर (पूर्व) दुरुस्तीकरणे.
फ-उत्तर विभाग.
ना हरकत प्रमाणपत्र अदा करणेबाबत.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१०३ ते १०५ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

-----------o-o------o---------

ठराव क्रमांक -१४३/ १२७५

इ.क्र.१६३-डी, हरिहर निवास, डॉ.बी.ए.मार्ग, दादर (पूर्व) या इमारतीच्या दुरुस्तीच्या प्रस्ताव ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह अदा करण्यास व सदर काम ना हरकत प्रमाणपत्राव्दारे प्रचलीत पध्दतीप्रमाणे At par दराने देण्यासाठी सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

बाब क्रमांक - १४३. ८

विषय - इमारत क्र. १२-१८, मंगलवाडी, दारुवाला बिल्डिंग, या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करणेबाबत.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१०७ ते १०९ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक -१४३/ १२७६

इमारत क्र. १२-१८, मंगलवाडी, दारुवाला बिल्डिंग, या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करणेस व सदर इमारतीची पुन्हा दुरुस्ती करण्याकरिता सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

-----------o-o------o---------

**बाब क्रमांक - १४३. ९**

विषय- इमारत क्र.१२, शेणवीवाडी लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
सुसुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१११ ते ११३ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१४३/ १२७६**

इमारत क्र.१२, शेणवीवाडी लेन या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे नकाशे व अंदाजपत्रकास रु.२०००/- प्रती चौ.मि. प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आत प्रशासकीय मान्यता रु.१८,०२,८०५ ( वाढीव रक्कमेसह रु. १,७१,८५१/- ) इतक्या रक्कमेस व खर्च रु. १९९६.७९/- प्रती चौ.मि. या रक्कमेस सुसुधारित प्रशासकीय मान्यता सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १४३ -(१०) पुनर्विकास**

विषय - **मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.**

--------------o-------o------------

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासा करीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे १६ प्रस्ताव पृष्ठ क्र. ११५ ते १७९ वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती अ.क्र.६ वर नमुद केलेल्या प्रस्तावास सध्या प्रलंबित ठेवण्यांचे व उर्वरित १५ प्रस्तावाना सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

१. भुकर पहाणी क्र.१६०७, मांडवी विभाग, इ.क्र.८, तांडेल क्रॉस लेन, मुंबई ४०० ००९ मुंबई येथील '**मलीका मंझील**'.
२ भूकर पहाणी क्र.४८०, मलबार कंबाला हिल विभाग, इ.क्र.११-११ए-११एए, ओव्हेंडन रोड व इ.क्र.१, वाच्छा गांधी मार्ग, डी-विभाग, मुंबई ०७ येथील '**टेंपल व्हयू**'..
३ भुकर पहाणी क्र.१२५५ भायखळा विभाग, इ.क्र.२३, टेमकर स्ट्रीट, मुंबई येथील '**झेनामबाई अकबरअली बिल्डींग**'.
४. भुकर पहाणी क्र.१७८४, भायखळा विभाग, इ.क्र.१ न्यु साऊटर स्ट्रीट आणि १५-१७ सांखली स्ट्रीट, मुंबई येथील '**नमकवाला चाळ**'.
५. भुकर पहाणी क्र.१४६४, भायखळा विभाग, इ.क्र.२२-३४, डीमटीमकर रोड, मुंबई-४००००८ येथील '**खान मंझील**'.
६. भुकर पहाणी क्र.१०९९, १/१०९९ आणि २/१०९९, भायखळा विभाग, इ.क्र.४०-५० आणि ४० खांडिया स्ट्रीट, मुंबई-४०० ००२ येथील '**झैनब मंझील**'.
७. भुकर पहाणी क्र.१/५९०, भायखळा विभाग, इ.क्र.७४-८६ आणि ८६अे, विक्टोरीया रोड, माझगांव, मुंबई ४०० ०१० येथील '**इक्बाल मॅन्शन**'.

८. भुकर पहाणी क्र.११४७ आणि ११४८, भायखळा विभाग, इ.क्र.९७, ९७ आणि ९९-१०१, उंद्रीया स्ट्रीट, भायखळा, मुंबई ४०००08 येथील **'बरकती मंझील आणि कलसुमबाई बिल्डींग'**.
९. भुकर पहाणी क्र.१२५८, भायखळा विभाग, इ.क्र.२९-२९अे, टेमकर स्ट्रीट, मुंबई येथील **'नानवाला बिल्डींग'**.
१०. भुकर पहाणी क्र.४१९/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.९३, दादर-माटुंगा इस्टेट, इ.क्र.८, हिंदु कॉलनी रोड क्र.११अे, माटुंगा, मुंबई १९ येथील **'खोसा हाऊस'**.
११. भुकर पहाणी क्र.५/७४-परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.१२८, सुपारी बाग इस्टेट, इ.क्र.२०, नरे पार्क, रोड क्र.४, परेल, मुंबई १२ येथील **'फिनले हाऊस'**.
१२. अंतिम भूखंड क्र.७२६, टीपीएस-३, माहिम विभाग इ.क्र.३८, बालमिया लेन, माहिम, मुंबई १६, **'फरहान मंझिल'**
**१३.** भूकर पहाणी क्र.१५७१(भाग), अंतिम भूखंड क्र.३, टीपीएस-३, माहिम विभाग, इ.क्र.२००बी, तुळशीपाईप रोड, दादर-(पश्चिम) मुंबई-२८ येथील **'बागवे निवास'**.
**१४.** भुकर पहाणी क्र.३५६-परळ-शिवडी विभाग, इ.क्र.४०-डी, भगवंतराव परळकर मार्ग, परळ व्हीलेज, परळ, मुंबई ४०००१२ येथील **'बी.बी.उस्मान चाळ'**.
१५. भूकर पहाणी क्र.२०१, लोअर परेल विभाग, इ.क्र.१९१-१९५, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई येथील **'गोरा गांधी चाळ'**.
१६. भूकर पहाणी क्र.२२३/७४, परेल शिवडी विभाग, इ.क्र.२६-२६सी, गोखले सोसायटी लेन, परेल, मुंबई १२ **'भाग्यम बिल्डींग'**.

**ठराव क्रमांक - १४३ / १२७५**

मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील १६ मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांवर चर्चा झाली.त्यामधील अ.क्र.६ वरील भुकर पहाणी क्र.१०९९, १/१०९९ आणि २/१०९९, भायखळा विभाग, इ.क्र.४०-५० आणि ४० खांडिया स्ट्रीट, मुंबई-४०० ००२ येथील **'झैनब मंझील'**.यावर चर्चा झाली चर्चेअंती मा.सन्मा.सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर प्रस्तावामध्ये ३ भूखंड असून ६० टक्के प्रोत्साहनात्मक चटई निर्देशांक देणेऐवजी ५० % का दिले म्हणून विचारणा केली.

यावर श्री.महिषी सचिव यांनी असे सांगितले की, अर्जदाराने सादर केलेल्या ३ भूखंडापैकी २ भूखंडाचे सुधारित मालकी पत्र सादर केल्यानंतर ६० % प्रोत्साहनात्मक चटई निर्देशांक देणेबाबतचा प्रस्ताव आहे.

यावर सर्व सन्मा.सदस्यांनी असे सांगितले की, प्रथम अर्जदाराने सुधारित मालकी पत्र सादर करावे, तद्नंतरच प्रस्ताव मंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यांत यावा, त्यामुळे सदर प्रस्तावास मंजूरी न देता प्रलंबित ठेवण्यांत आला व उर्वरित १५ प्रस्तावास नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली .

१. भुकर पहाणी क्र.१६०७, मांडवी विभाग, इ.क्र.८, तांडेल क्रॉस लेन, मुंबई ४०० ००९ मुंबई येथील **'मलीका मंझील'**.

२. भूकर पहाणी क्र.४८०, मलबार कंबाला हिल विभाग, इ.क्र.११-११ए-११एए, ओव्हेंडन रोड व इ.क्र.१, वाच्छा गांधी मार्ग, डी-विभाग, मुंबई ०७ येथील **'टेंपल व्ह्यू'**..
३. भुकर पहाणी क्र.१२५५ भायखळा विभाग, इ.क्र.२३, टेमकर स्ट्रीट, मुंबई

येथील '**झेनामबाई अकबरअली बिल्डींग**'.

४. भुकर पहाणी क्र.१७८४, भायखळा विभाग, इ.क्र.१ न्यु साऊटर स्ट्रीट आणि १५-१७ सांखली स्ट्रीट, मुंबई येथील '**नमकवाला चाळ**'.

५. भुकर पहाणी क्र.१४६४, भायखळा विभाग, इ.क्र.२२-३४, डीमटीमकर रोड, मुंबई-४०००८ येथील '**खान मंझील**'.

६. भुकर पहाणी क्र.१/५९०, भायखळा विभाग, इ.क्र.७४-८६ आणि ८६अे, विक्टोरीया रोड, माझगांव, मुंबई ४०० ०१० येथील '**इक्बाल मॅन्शन**'.

७.. भुकर पहाणी क्र.११४७ आणि ११४८, भायखळा विभाग, इ.क्र.९७, ९७ आणि ९९-१०१, उंद्रीया स्ट्रीट, भायखळा, मुंबई ४०००८ येथील '**बरकती मंझील आणि कलसुमबाई बिल्डींग**'.

८. भुकर पहाणी क्र.१२५८, भायखळा विभाग, इ.क्र.२९-२९अे, टेमकर स्ट्रीट, मुंबई येथील '**नानवाला बिल्डींग**'.

९. भुकर पहाणी क्र.४१९/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.९३, दादर-माटुंगा इस्टेट, इ.क्र.८, हिंदु कॉलनी रोड क्र.११अे, माटुंगा, मुंबई १९ येथील '**खोसा हाऊस**'.

१०. भुकर पहाणी क्र.५/७४-परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.१२८, सुपारी बाग इस्टेट, इ.क्र.२०, नरे पार्क, रोड क्र.४, परेल, मुंबई १२ येथील '**फिनले हाऊस**'.

११. अंतिम भूखंड क्र.७२६, टीपीएस-३, माहिम विभाग इ.क्र.३८, बालमिया लेन, माहिम, मुंबई १६, '**फरहान मंझिल**'

**१२.** भूकर पहाणी क्र.१५७१(भाग), अंतिम भूखंड क्र.३, टीपीएस-३, माहिम विभाग, इ.क्र.२००बी, तुळशीपाईप रोड, दादर-(पश्चिम) मुंबई-२८ येथील '**बागवे निवास**'.

१३. भुकर पहाणी क्र.३५६-परळ-शिवडी विभाग, इ.क्र.४०-डी, भगवंतराव परळकर मार्ग, परळ व्हीलेज, परळ, मुंबई ४०००१२ येथील '**बी.बी.उस्मान चाळ**'.

१४. भूकर पहाणी क्र.२०१, लोअर परेल विभाग, इ.क्र.१९१-१९५, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई येथील '**गोरा गांधी चाळ**'.

१५. भूकर पहाणी क्र.२२३/७४, परेल शिवडी विभाग, इ.क्र.२६-२६सी, गोखले सोसायटी लेन, परेल, मुंबई १२ '**भाग्यम बिल्डींग**'.

-----------oo----------

<u>मा.सभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय घेण्याचे ठरले</u>

<u>बाब क्र.१४३.११</u>

**विषय - इमारत क्र.४ माणिकजी स्ट्रीट व २५-२९ राजवाडकर स्ट्रीट,३८ एडलजी स्ट्रीट, सी.एस.क्र.२२९ (भाग) २३० कुलाबा अ-विभाग, मुंबई. -सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

--------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र. १८१ तं १८५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक - १४२/ १२७६</u>

सविस्तर चर्चेअंती **इमारत क्र.४ माणिकजी स्ट्रीट व २५-२९ राजवाडकर स्ट्रीट,३८ एडलजी स्ट्रीट, सी.एस.क्र.२२९ (भाग) २३० कुलाबा अ-विभाग, मुंबई** या इमारतीच्या **पुनबांधणी कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास रक्कम रु.२,२४,४३,०९६/- या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता** सवानुमते मंजूरी देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o-----------

बैठकीच्या शेवटी डॉ.श्री.रमेश सुरवाडे,सहमुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यानी असे सांगितले त्यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर मंडळातील विविध विभागाचा अभ्यास करुन एक सॉफ्टवेअर तयार केले असून, त्यामुळे पुढील काळात मंडळाचे काम उत्तम प्रकारे होईल अशी खात्री आहे.

सहमुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी नव्याने तयार केलेल्या सॉफ्टवेअरबद्दल माहिती दिली. त्यामध्ये आतापर्यंत संक्रमण शिबिर विभागामधील फाईल व रेकॉड नीट न ठेवल्यामुळे कार्यालयीन कामात ब-याच अडचणी येत होत्या व काम जलद करणे शक्य होत नव्हते त्यामुळे सध्या संक्रमण शिबिरातीली सर्व फाईलची डेटा एन्ट्री व स्कॉनिक करणे फाईलस नंबरीग करणे इत्यादी कामे मागील काही दिवसाच्या कालावधी सुरु असून सर्व फाईलची एंन्ट्री व स्कॉनिक करण्यास जवळजवळ एक माहिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे कार्यवाही मंडळातर्फे सुरु करण्यांत आलेली आहे. दोन शिफ्टमध्ये ही कामे होत आहेत. ही काम पूर्ण झाल्यानंतर आपल्याला कार्यालयीन काम करताना भाडेकरु/रहिवाशांच्या वैयक्तिक नस्ती पहाण्याची गरज भासणार नाही, कारण वितरणासाठी जी माहिती आपणांस लागणार आहे ती सदरच्या फॉर्मेटमध्ये आपणांस उपलब्ध होणार आहे.

यानंतर मा.सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव व सर्व सन्मा.सदस्यांनी श्री.सुरवाडे, सहमुख्य अधिकारी यांनी तयार केलेल्या नवीन फॉमेंटबद्दल अभिनंदन केले. सन्मा.सदस्या श्री.किसन जाधव यांनी असे सांगितले की, हे फार पूर्वीपासून व्हावयास हवे होते परंतु आता आपण एकविसाव्या शतकात पदार्पण करीत असून अशा प्रकारच्या कार्यवाहीबद्दल त्यांचे मनपूर्वक आभार व्यक्त केले.

बैठकीच्या अखेरीस सहमुख्य अधिकारी यांनी सर्व सन्मा.सदस्याचे व सर्व अधिकारी/कर्मचा-यांचे आभार मानून वर दाखविण्यांत आलेल्या प्रझेंटेशनबद्दल आपल्या काही सूचना असतील तर त्या जरुर कराव्यात त्याचा फायदा भविष्यात मंडळास होणार आहे असे सांगितले, कारण आपल्या सर्वांना याबाबत माझ्यापेक्षा नक्कीच जास्त अनुभव आहे. यामध्ये सर्व सन्मा.सदस्यांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.-

**सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता**
**मुं.इ.दु.व पु.मंडळ.**

**स्वाक्षरीत/-**
**मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,**
**मुं.इ. दु.व पु.मंडळ**